File No.PBN-18021(11)/82/2019-PBN-DPO-COLLECTOR OFFICE-PARBHANI

# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिवायो 007/प्र.क्र.39/का-1444, दि.16.02.2008
2. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो 1007/प्र.क्र.39/का-1444, दि.16 फेब्रुवारी,2008
3. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो 1015/प्र.क्र.215/का-1481, दि.15.02.2016
4. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.डिएपी - 1017/प्र.क्र.98/का.1481, दि.27 जुलै 2017
5. का.अ.सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे निधी मागणी पत्र क्र.लेखा अर्थ/1343, दि.25.03.2019

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/बळकटीकरण/नि.वि./का.क्र.1/ 875

दि.30 मार्च, 2019

**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018 -19 अंतर्गत निधी वितरण आदेश**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 या वित्तिय वर्षामध्ये कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांचेकडील 'जिल्हा नियोजन समितीचे बळकटीकरण करणे' या योजनेसाठी रु.21.00 लक्ष तरतूद मंजूर असुन रु.15.74 लक्षच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संदर्भ क्र.5 अन्वये निधीची मागणी केलेली आहे. त्यास अधिन राहुन व संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून उपलब्ध निधीनूसार मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील तपशिलाप्रमाणे **रु.15.74 लक्ष (अक्षरी रुपये पंधरा लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त)** निधी वितरीत करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ क्र | योजनेचे नाव | लेखाशिर्ष | मंजूर तरतूद | प्रशासकीय मान्यता किंमत | या आदेशान्वये वितरित निधी |
|---|---|---|---|---|---|
| | **कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी** | | | | |
| 1 | जिल्हा नियोजन समितीचे बळकटीकरण करणे | (3451 2844) 13 - कार्यालयीन खर्च | 21.00 | 15.74 | 15.74 |
| | एकूण | | 21.00 | 15.74 | 15.74 |

**(अक्षरी रुपये पंधरा लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त)**

**अटी व शर्ती**

1. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी चालू आर्थिक वर्ष 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील.
2. उपरोक्त कामाचे तुकडे न पाडता एकत्रितरित्या किंमतीच्या रकमेची एकच ई-निविदा करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. सदर निधी खर्च करण्यासाठी शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचना/निकषांनुसारच खर्च करण्यात यावा.
3. ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेला आहे त्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा इतर कोणत्याही योजनांवर/कामावर खर्च करण्यात येवू नये.
4. या योजनेंतर्गतच्या कामांना आवश्यक असलेली प्रशासकीय मान्यता/तांत्रीक मंजूरी प्रचलित पध्दतीप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील या अटीवरच सदर प्रशासकिय मान्यता व निधी वितरण करण्यात येत आहे.
5 या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी चालू आर्थिक **वर्ष 2018-19** अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील.
6. या योजनेतंर्गतच्या कामांना असलेली तांत्रीक मंजूरी /प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच निधी खर्च करावा.
7. सदर योजनांची/कामांची अमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात यावी. सदरील बांधकामाच्या देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबधित विभागाची राहील. सदरील कामाचे देखभाल दुरूस्तीचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
8. या आदेशान्वये मंजूर केलेल्या कामाची पुनरावृत्ती झालेली नाही याची खात्री करूनच काम सुरू करावे. कामाची पुनरावृत्ती झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

9. या योजनेसाठी / कामासाठी आवश्यक असलेल्या तांत्रीक बाबीची तसेच शासनाने ठरवून दिलेल्या निकषाची पुर्तता करण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

10. सदरील सहाय्यक अनुदानांची उपयोगीता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची सुध्दा एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

11. या योजनेतंर्गत घेण्यात येणाऱ्या कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबधित कार्यानिवयीन यंत्रणेची राहील.

12. प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या अधिन राहूनच योजनेवर खर्च करण्यात यावा. तसेच सदरील योजना अन्य कोणत्याही निधीतून घेण्यात आली नाही याची खात्री करावी.

13. या योजनेंतर्गत कामांची खाजगी/त्रयस्थ यंत्रणेमार्फत मुल्यमापन करण्यात येवू शकेल. तेव्हा योजनेतंर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा. आणि दरमहा 5 तारखेपूर्वी या कार्यालयास अहवाल सादर करावा.

14. आवश्यक असलेल्या कामाबाबत निविदा मागविणे, स्वीकृत करणे व खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित पध्दतीनुसार राहतील. रु.3.00 लाखांवरील कामांसाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा.

15. प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात प्रत्येक दरांचे वर्णन / दर / दरपृथःकरण / रक्कम /दर पृथःकरणातील गृहित धरलेली अंतरे व अनुषंगिक ईतर बाबी तांत्रीक मान्यता प्रदान करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात या कार्यालयाचे / शासनाचे कोणतेही उतरदायित्व असणार नाही.

16. या योजनेतील खर्च 2018-19 या वितीय वर्षात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत कॅशफ्लोनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. या योजनेवर होणारा खर्च (3451 1848) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

**या योजनेवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.**

नियोजन विभाग मागणी क्रमांक ओ - 50,
3451 - सचिवालयीन आर्थिक सेवा
00, 101 - नियोजन आयोग- नियोजन मंडळ
(49) जिल्हा योजना-परभणी
(49) (01) नाविन्यपुर्ण योजना **(3451 2844)**
13 - कार्यालयीन खर्च

प्रति,
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव
1. महालेखापाल, नागपूर - 2
2. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

Signature valid

Digitally signed by P SIVA SANKAR
Date: 2019.03.30 1?:38:08 IST
Reason: Approved